# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./४५५/२०२० दि.२८/०१/२०२०

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य/प्राध्यापक/शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही गुरूवार दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मौन पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा, असे निर्देश शासनाव्दारे देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांनी सोबत संलग्नित शासन परिपत्रकाचे अवलोकन करून परिपत्रकानुसार आवश्यक कार्यवाही घ्यावी.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- शासन परिपत्रक

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,

Milind Salodkar

**दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता ) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२०/प्र.क्र.५/२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २७ जानेवारी, २०२०

**वाचा** :- केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या क्र.२/२/२०२०-Public, दिनांक ०८.०१.२०२० चे पत्र.

**प रि प त्र क**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही गुरुवार,दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. गुरुवार, दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता ) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/आस्थापना/शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता ) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००१२७१२५८५२५९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VALVI JANA
JIVA

**( ज. जि. वळवी )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,